**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री.नागनाथ उध्दव कदम
मु. पो. उपळाई (खुर्द),
ता. माढा, जि. सोलापूर **अपीलकर्ता**

विरूध्द

**जन माहिती अधिकारी तथा**
शिक्षण प्रमुख, शिक्षण मंडळ,
पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | १३८१/ सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२६.१२.२००८ |
| ३ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**<br><br>शिक्षक भरती प्रक्रियेबाबतची माहिती. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. नागनाथ उध्दव कदम यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. तसेच त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांवरून त्यांनी अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील केल्याचे दिसून येत नाही. सबब त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे
दि. ३०.१२.२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री. दत्तात्रय विलास हरीश्चंद्रे
रा.जेजूरी, ता.पुरंदर, जि.पुणे **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
३२९, राजधानी टॉवर्स, जि.सातारा **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
३२९, राजधानी टॉवर्स, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३८२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.१०.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. दत्तात्रय विलास हरीश्चंद्रे
रा.जेजूरी, ता.पुरंदर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
३२९, राजधानी टॉवर्स, जि.सातारा श्री.पी.बी.तिजारे

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
३२९, राजधानी टॉवर्स, जि.सातारा श्री.सदाशिवराव ह.राऊत

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२५.०८.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.३१.०८.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.- |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१९.१०.२००७ |
| ७ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र -अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२१.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने त्याच दिवशी सुनावणी घेण्यात आली.

श्री भैरवनाथ एन्डॉवमेंट ट्रस्ट,लोणंद, जि.सातारा या ट्रस्टच्या जमिनीच्या हस्तांतरणाबाबतची माहिती, तसेच ताळेबंदाच्या प्रती मिळाल्या नाहीत, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. दत्तात्रय विलास हरीश्चंद्रे यांनी केली. याबाबतची संपूर्ण माहिती श्री.हरीश्चंद्रे यांना देण्यात आली. न्यासाचे वार्षिक उत्पन्न रु.३००/- च्या आत असल्याने ट्रस्टने ताळेबंद केले नाही. संबंधित प्रतिज्ञापत्राची प्रत श्री. हरीश्चंद्रे यांना देण्यात आली. श्री. हरीश्चंद्रे यांनी ट्रस्टचे नेमके नाव व क्रमांक कळविला नाही. तथापि पंधरा हजार ट्रस्टमधून शोधून माहिती दिली, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक,सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,सातारा विभाग, जि.सातारा श्री.सदाशिव ह. राऊत यांनी पूरक कागदपत्रांसाह केले. जमिनीच्या हस्तांतरणाबाबतची व अन्य अनुषंगिक माहिती श्री.हरीश्चंद्रे यांना देण्याचे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,सातारा विभाग, जि.सातारा श्री.सदाशिव ह. राऊत व अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सातारा विभाग, सातारा श्री.पी.बी.तिजारे यांच्या वतीने दि.१०.११.२००९ च्या पत्रान्वये सादर करण्यात आला. तो मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दिनांक : ११ /१२/२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. नारायण भिवा कांबळे — अपीलकर्ता
मु.पो.शिरगाव, ता. कराड, जि. सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी वर्ग-१, पंचायत समिती , कराड
ता. कराड, जि. सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत शिरगाव, ता. कराड
जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३९ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०.१२.२००८ |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** | श्री. नारायण भिवा कांबळे<br>मु.पो.शिरगाव, ता. कराड, जि. सातारा |
| | **अपिलीय प्राधिकारी तथा** | गट विकास अधिकारी वर्ग-१, पंचायत समिती ,<br>कराड, ता. कराड, जि. सातारा<br>श्री. अनिल सोनवणे |
| | **जन माहिती अधिकारी तथा** | ग्रामसेवक, ग्रामपंचायत, शिरगाव, ता. कराड<br>जि. सातारा श्री. अे.व्ही. निकम |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.९.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३.१०.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

सन १९८५ ते २००५ या कालावधीतील विकास कामांची माहिती अपुरी मिळाल्याची तक्रार अपीलकर्ता श्री. नारायण भिवा कांबळे यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

श्री. कांबळे यांना विहित मुदतीत उत्तर पाठविण्यात आले. त्यांच्या सोबत अन्य अर्जदारांनी केलेले अर्ज परिपूर्ण नव्हते, तसेच दारिद्र्य रेषेखाली असल्याचा कोणताही पुरावा जोडलेला नव्हता. त्याबाबत त्यांना कळविले होते. परंतु कोणतीच पूर्तता न करता त्यांनी अपील केले. अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेल्या आदेशानुसार ग्रामपंचायतीत उपलब्ध असलेली सर्व माहिती दिली. आपल्याकडे तीन ग्रामपंचायतींचा अतिरिक्त कार्यभार असल्यामुळे विलंब झाला. माहिती मागणी विस्तृत असून आणखी काही तपशिलाची मागणी त्यांनी केली. 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील एकमताच्या निर्णयानुसार तत्कालीन ग्रामसेवक श्री. डी. बी. साळुंखे यांनी आठ दिवसांत त्यांना माहिती दिली आहे, असे लेखी निवेदन तत्कालीन ग्रामसेवक श्री. डी.बी. सांळुखे यांनी दिला असून या कागदपत्रांसह सर्व तपशील विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, पंचायत समिती, शिरगाव, ता. कराड श्री. अे.व्ही.निकम यांनी सादर केला. तो योग्य असल्याचे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी वर्ग-१, पंचायत समिती, कराड श्री. ए. एस. सोनवणे यांनी केले.

अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे. आणखी तपशील हवा असल्यास अभिलेखाचे अवलोकन करुन त्यांना तो घेता येईल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

पुणे
दि. ११.१२.२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सुभाष निवृत्ती शिलवंत
मु.पो.शिरगाव, ता.कराड, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, कराड, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत शिरगाव, ता.कराड, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४१+१४२ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.१२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुभाष निवृत्ती शिलवंत
मु.पो.शिरगाव, ता.कराड, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, कराड, जि.सातारा श्री.अनिल सोनावणे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत शिरगाव, ता.कराड, जि.सातारा श्री.ए.व्ही.निकम

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ५.१०.२००६ व २०.१०.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ४.११.२००६ २०.११.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २३.११.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ४.१२.२००६ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १५.५.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. १०.१२.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपल्या दोन अर्जानुसार मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत शिरगाव, ता.कराड, जि.सातारा यांनी उशिरा दिली. मागासवर्गीय १५ टक्के अनुदानातील अनुशेष दडविण्यासाठी गटविकास अधिकारी यांनी ग्रामसेवकांमार्फत खोटी व दिशाभूल करणारी माहिती दिली. तसेच एकाच ग्रामपंचायतीच्या वार्षिक उत्पन्नातील दोन वेळा दिलेल्या माहितीत मोठी तफावत आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.सुभाश निवृत्ती शिलवंत यांनी केले.

श्री.शिलवंत यांनी सन १९७५ ते २००६ एवढ्या विस्तृत कालावधीतील माहिती मागितली होती. त्यातील काही मुद्दयांची माहिती त्वरित देणे शक्य होते, ती त्वरित दिली. मात्र काही माहितीची मागणी सुस्पष्ट नव्हती. खुलासेवजा, प्रश्नार्थक विचारणा केली होती. तसेच दारिद्र्यरेषेखाली असल्याचा पुरावा त्यांनी जोडला नव्हता. त्यामुळे सर्व त्रुटींची पूर्तता करून माहितीची मागणी करावी म्हणजे माहिती देणे सोयीचे होईल, असे दोन पत्रांद्वारे त्यांना कळविले होते. अंदाजपत्रकावरून माहिती काढून दिली आहे. १५ टक्के अनुशेषाबाबतचे त्यांचे म्हणणे योग्य नाही. तो खर्च केलेला आहे. याच काळात आपल्याकडे अन्य तीन ग्रामपंचायतींचा अतिरिक्त कार्यभार होता. प्रथम अपिलाच्या सुनावणीनंतर व 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील सर्वसंमतीनुसार त्या

त्या वेळी श्री.शिलवंत यांना माहिती देण्यात आली. ज्या जागेची मालकी ग्रामपंचायतीकडे नाही. गावचा सिटी सर्व्हे झालेला नसल्यामुळे ती देता येणे शक्य नसल्याचे त्यांना कळविले. त्याचबरोबर सिटी सर्व्हे होण्याबाबत केलेल्या पत्रव्यवहाराची माहितीही त्यांना दिली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत शिरगाव, ता.कराड, जि.सातारा श्री.ए.व्ही.निकम यांनी केले. कागदोपत्री नोंद आहे त्याप्रमाणे खर्चाची आकडेवारी देण्यात आली आहे. अपीलकर्त्यांना समक्ष अभिलेख दाखविले आहेत, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कराड, ता.कराड, जि.सातारा श्री.अनिल सोनावणे यांनी केले. विलंबाबाबत तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांनी तीन दिवसांत खुलासा सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत शिरगाव, ता.कराड, जि.सातारा श्री.डी.बी.साळुंखे यांनी दि.११.१२.२००८ च्या पत्रान्वये आयोगाला खुलासा सादर केला. तो मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.१५.१२.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

१. श्री. पांडुरंग गेनबा बढे — अपीलकर्ता
२. श्री. गेनबा तान्हू बढे
मु.पो.नेरे, ता.भोर, जि. पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी — उत्तरवादी
पंचायत समिती, भोर, ता. भोर, जि. पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत नेरे, ता. भोर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४७६ + १७८० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७.११.२००९ |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** | १. श्री. पांडुरंग गेनबा बढे<br>२. श्री. गेनबा तान्हू बढे<br>मु.पो.नेरे, ता.भोर, जि. पुणे |
| | **अपिलीय प्राधिकारी** तथा | विस्तार अधिकारी<br>पंचायत समिती, भोर, ता. भोर, जि. पुणे<br>श्री. बी. टी. गाडेकर |
| | **जन माहिती अधिकारी** तथा | ग्रामसेवक, ग्रामपंचायत नेरे, ता. भोर, जि. पुणे<br>श्री. के.एस. बनसोडे |

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| १७८० / पुणे | २१.४.२००७ | -- | ५.७.२००७ | -- |
| १४७६ / पुणे | ३.९.२००९ | -- | १५.९.२००९ | -- |

| | |
|---|---|
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आपल्या मिळकतीबाबत जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत नेरे, ता. भोर चुकीची माहिती देतात. ग्रामसेवकांनी फेरआकारणीमध्ये क्षेत्रफळ जादा लावले असून ते कमी करून दिले जात नाही व क्षेत्र वाढले कसे याचे उत्तर दिले जात नाही. १०० वर्षांपूर्वीचा आपला मूळ वाडा असून नवीन घराच्या क्षेत्रफळात २००७ नंतर वाढ कशी व का झाली, याची माहिती ग्रामसेवक व सरपंच यांनी क्षेत्रफळ वाढल्याचे मान्य करूनही, देत नाहीत, अशी तक्रार अपीलकर्ते श्री. पांडुरंग गेनबा बढे व श्री. गेनबा तान्हू बढे यांनी केली.

श्री. बढे यांनी दि. २१.३.२००७ रोजी अर्ज केला होता. दुसऱ्या दिवशी त्यांना माहिती देऊन पोहच घेतली आहे. उपलब्ध कागदपत्रांनुसार सर्व माहिती देण्यात आली. ग्रामपंचायतीने मासिक सभेत गावातील सर्व मिळकतींची मोजमापे घेण्याचे ठराव दि. २१.११.२००३ व दि. २२.११.२००४ च्या ग्रामसभेत झाले. त्यानुसार मोजमापे निश्चित केलेली आहेत. या संदर्भात भोरच्या न्यायालयात दावा दाखल असून प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे ग्रामपंचायत याबाबत कोणताही फेरफार करू शकत नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत नेरे, ता. भोर श्री. श्री. बी.टी. गाडेकर यांनी केले. लगतच्या मिळकतदारांचे जबाब घेऊन मापे कायम केली जातात, त्यावेळी श्री. बढे गावात नव्हते. नोव्हेंबर २००३ मध्ये गावातील मिळकतीची मोजमापे घेऊन मासिक सभेत ती कायम करण्यात आली. श्री. बढे यांनी त्याबाबत हरकत दिली नाही. असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, भोर श्री. बी. टी. गाडेकर यांनी केले.

तत्कालीन ग्रामसेवक श्री. अे.एस. देसाई यांचे म्हणणे घेऊन श्री. बढे यांच्या मागणी संदर्भातील वस्तुस्थितीवर आधारित अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, भोर श्री. बी. टी. गाडेकर यांनी पंधरा दिवसांत सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार श्री. गाडेकर यांनी दि. ३०.११.२००९ च्या पत्रान्वये आयोगाला अहवाल सादर केला. आपल्या घराच्या मोजणीबाबतच्या ठरावाची व पाहणीची प्रत आपल्याला मिळाली नसल्याची श्री. बढे यांची तक्रार आहे. परंतु ग्रामसभेने केलेला ठराव एका व्यक्तीच्या मिळकतींसाठी नसून गावातील सर्व मिळकतीसाठी आहे. तत्कालीन ग्रामसेवक श्री. एन.डी. राठोड (सध्या पंचायत समिती, दौंड ) यांनी मोजमापे स्वतः घेतलेली आहेत. दि. १८.११.२००९ रोजी प्रत्यक्ष जागेवर जाऊन स्थळपाहणी केली असता जादा लागलेल्या (१८० चौ. फूट) क्षेत्रफळासाठी बांधकाम झालेले आहे. सदर बांधकामाबाबत भोरच्या न्यायालयात दाखल असलेला दावा निकाली निघाल्यावर किंवा काढून घेतल्यावर न्यायालयाकडून ग्रामपंचायतीला कळविल्यास १८० चौ. फुट क्षेत्रफळाबाबत ग्रामपंचायतीला

निर्णय घेणे सोईचे होईल, असे ग्रामसेवक श्री. गाडेकर यांनी अनुषंगिक कागदपत्रांसह अहवालात नमूद केले आहे.

श्री. बढे यांची मूळ मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तथापि कार्यवाहीच्या अनुषंगानेही माहिती देण्यात आली असून अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, भोर श्री. गाडेकर यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. १७.१२.२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सदाशिव सखाराम पोवार
२६५१, डी, डांगे गल्ली, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर — उत्तरवादी

(१)**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक संचालक, नगररचना,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

(२)**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य लेखापाल,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

(३)**जन माहिती अधिकारी** तथा इस्टेट ऑफिसर,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४८+४४४/२००९/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.११.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्रीमती शिल्पा नाईक

(२)**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य लेखापाल,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री.संजय सरनाईक

(३)**जन माहिती अधिकारी** तथा इस्टेट ऑफिसर,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री.रामचंद्र काटकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२१.२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २५.३.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १.४.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १७.४.२००९ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

नगरविकास योजनेमध्ये संरक्षित कुळाला तीन व मालकाला दोन भूखंड दिले असून मूळ मालकाला नुकसानभरपाईची रक्कम दिली आहे. त्याबाबतची कब्जेपट्टीची व इतर माहिती आपल्याला दिली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.सदाशिव सखाराम पोवार यांनी केली.

श्री.पोवार यांनी आतापर्यंत २० वेळा या संदर्भात अर्ज केले आहेत. विशिष्ट रक्कम दिल्याची पावती आढळून येत नाही, मात्र भूखंड दिल्याची पावती आहे. मालकाला जमिनीच्या बदल्यात तीन भूखंड दिलेले आहेत. कुळाला भूखंड कब्जेपट्टी दिलेली नाही, असे जन माहिती अधिकारी तथा मुख्य लेखापाल, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री.संजय सरनाईक व जन माहिती अधिकारी तथा इस्टेट ऑफिसर, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री.रामचंद्र काटकर यांनी नमूद केले (अ.क्र.१४८), तर इस्टेट विभागामार्फत शासनाकडे अनुषंगिक पत्र देण्यात आले असल्याचे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगररचना, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री.मधुकर देवडे यांनी नमूद केले(अ.क्र.४४४).

मूळ मालकाला रक्कम दिल्याचे पत्र, शासनाला इस्टेट विभागामार्फत पाठविलेल्या पत्राची प्रत व कुळाला भूखंड दिला नसल्याचे लेखी पत्र अपीलकर्त्यास तीन दिवसात देण्याचे मौखिक

आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार श्री.पोवार यांना पत्राच्या प्रती देण्यात आल्या, व आदेशाची पूर्तता करण्यात आल्याचे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगररचना, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री.मधुकर देवडे यांनी दि.२१.११.२००९ च्या पत्रान्वये आयोगास कळविले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि.१५.१२.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.विष्णू दत्तात्रय बर्वे
समर्थ खादी भांडार, मेन रोड, सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त आयुक्त, सांगली, मिरज आणि
कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली, जि.सांगली. — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त, सांगली, मिरज आणि
कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली, जि.सांगली.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४९+१५० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विष्णू दत्तात्रय बर्वे
समर्थ खादी भांडार, मेन रोड, सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त आयुक्त, सांगली, मिरज आणि
कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली, जि.सांगली प्रतिनिधी श्री.वाय.बी.माळी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त, सांगली, मिरज
आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली, जि.सांगली श्री.एस.टी.रसाळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.१२.२००६ (अ.क्र.१४९)<br>दि.५.१.२००७ (अ.क्र.१५०) |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०.१.२००७ (अ.क्र.१४९)<br>दि.१३.२.२००७ (अ.क्र.१५०) |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३१.१.२००७ (अ.क्र.१४९)<br>दि.८.२.२००७ (अ.क्र.१५०) |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १३.२.२००७ (अ.क्र.१४९)<br>दि.२२.३.२००७ (अ.क्र.१५०) |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

सांगली महापालिकेची मालकी नसलेल्या जागेवर महापालिकेने इमारत बांधल्यासंदर्भातील माहिती विहित मुदतीत देण्यात आलेली नाही. तसेच या जागेत केलेल्या बांधकामाबाबतची माहितीही लेखी दिली पाहिजे, असे निवेदन अपीलकर्ता श्री.विष्णू दत्तात्रय बर्वे यांनी केले.

श्री.बर्वे यांच्या मूळ अर्जानुसार माहिती देण्यात आली. त्याबाबतच्या शंकांचे निरसन व अपूर्ण वाटणाऱ्या तपशिलाची माहिती आठ दिवसात देण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली, जि.सांगली श्री.एस.टी.रसाळे यांनी नमूद केले.

श्री.बर्वे यांच्या मूळ अर्जानुसार माहिती दिल्यानंतर अपिलादरम्यान नवे मुद्दे ते उपस्थित करतात. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत खुलासा, भाष्य अशी विचारणा करता येत नसताना तशा स्वरूपाची मागणी करतात. त्यामुळे नेमकेपणाने माहिती देण्यात अडचणी येतात, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली, जि.सांगली श्री.वाय.बी.माळी यांनी केले.

मूळ अर्जाव्यतिरिक्तची माहिती अपिलामध्ये मागणे योग्य नाही. अपीलकर्त्यास माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये देय असलेली माहिती विहित मुदतीत दिली गेली पाहिजे.

इमारतीचे बांधकाम केले की नाही, या माहितीत असलेल्या तफावतीच्या स्पष्टीकरणासह ऊर्वरित माहिती श्री.बर्वे यांना आठ दिवसांत द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार माहिती दिल्याचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली, जि.सांगली श्री.वाय.बी.माळी यांनी दि.८.९.२००८च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला व आपल्याला माहिती मिळाल्याचे अपीलकर्ता श्री.बर्वे यांनी दि.११.९.२००८ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि.१४.१२.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१.

श्री.गजानन कृष्णाजी जोशी
'सोहम,' शंकर तत्त्वज्ञान मंदिराजवळ,
मुलींच्या शाळेच्या मागे, ब्राम्हणपुरी,
मिरज, ता.मिरज, जिल्हा सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
उपविभागीय तालुका कृषि अधिकारी जत,
ता.जत, जिल्हा सांगली

**उत्तरवादी**

जन माहिती अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी जत,
ता.जत, जिल्हा सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४९६/ २००९सांगली व<br>१४९७/२००९/सांगली |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २५/०८/२००५व २०/०७/२००५ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ८/९/२००५ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८/८/२००९ |
| ५ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**<br>माहिती- मागणीच्या मूळ अर्जाच्या (जोडपत्र-अ) छायाप्रती सोबत जोडल्या आहेत. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.गजानन कृष्णाजी जोशी यांनी प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने राज्य माहिती आयोगाकडे दोन अपिले केली आहेत.

सदर अपिलासोबतची कागदपत्रे पाहता त्यांनी आयोगाकडे केलेल्या यापूर्वीच्या अपिलातील (क्र.५+ ३०/सांगली) विषय व या अपिलातील विषय व माहिती-मागणी एकच असल्याचे दिसून येते. यास्तव आयोगाने अपील क्र.५+३०/सांगली मध्ये दि. १३/१०/२००८रोजी दिलेला आदेश या अपिलातही लागू आहे. त्याच त्याच मागणीसाठी अशा प्रकारे पुन:पुन्हा अर्ज व अपिले करुन सर्व यंत्रणांचा वेळ व परिश्रम वाया न घालविण्याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१९-१२-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री. विनायक फकिरा विटकर
१७/२, बुधवार पेठ, गुरुवर्य लक्ष्मण महाराज नगर,
सोलापूर **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** उप संचालक,
भूमी अभिलेख संलग्न जमाबंदी आयुक्त (भूमापन), पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** कार्यालय अधिक्षक (आस्था-३),
जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५२६/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.०७.२००९ |
| **३.** | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** श्री. विनायक फकिरा विटकर<br>१७/२, बुधवार पेठ, गुरुवर्य लक्ष्मण महाराज नगर,<br>सोलापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** उप संचालक,<br>भूमी अभिलेख संलग्न जमाबंदी आयुक्त (भूमापन), पुणे श्री.दि.दि.क्षिरसागर<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** कार्यालय अधिक्षक (आस्था-३),<br>जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख, पुणे श्री.शिवाजी कोकणे | |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२९.१२.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१७.०१.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.- |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.०२.०४.२००९ |
| ७ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

# विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१६.०७.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने त्याच दिवशी सुनावणी घेण्यात आली.

उप संचालक, भूमी अभिलेख कार्यालयाने सर्वेअर/क्लार्क कम टाइपिस्ट पदासाठी घेतलेली परीक्षा व निवड याबाबतची अपुरी माहिती दिली. आपल्यासह सहा उमेदवारांच्या उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत 'त्रयस्थ पक्षाची माहिती' असल्याच्या कारणावरुन नाकारली. जाहिरातीत महिलांसाठी दोन पदे आरक्षित असल्याचे नमूद असताना तीन महिलांची निवड केली, हे चुकीचे आहे. अपिलीय प्राधिकारी तथा उप संचालक, भूमी अभिलेख संलग्न जमाबंदी आयुक्त (भूमापन), पुणे यांनी आपल्या अपिलाची योग्य दखल घेतली नाही. उत्तरपत्रिकांच्या प्रतींसह सर्व माहिती मिळावी व निवडीत आपल्यावर झालेला अन्याय दूर व्हावा, अशी मागणी अपीलकर्ता श्री.विनायक फकिरा विटकर यांनी केली.

श्री.विटकर यांनी मागितलेली उत्तरपत्रिकांव्यतिरक्तची सर्व माहिती त्यांना देण्यात आली. त्रयस्थ व्यक्तींच्या उत्तरपत्रिका ही माहिती देणे बंधनकारक नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख, पुणे श्री.शिवाजी कोकणे व अपिलीय प्राधिकारी तथा उप संचालक, भूमी अभिलेख संलग्न जमाबंदी आयुक्त (भूमापन), पुणे श्री.दि.दि.क्षिरसागर यांनी केले.

श्री.विटकर यांना उत्तरपत्रिकांव्यतिरिक्तची माहिती देण्यात आली आहे. निवडीतील अन्याय दूर व्हावा, महिलांसाठी आरक्षणानुसारच निवड व्हावी, या त्यांच्या मागण्या प्रशासकीय कार्यवाहीच्या असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत. तसेच अन्य उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांच्या प्रती नाकारण्याचा जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख, पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा उप संचालक, भूमी अभिलेख संलग्न जमाबंदी आयुक्त (भूमापन), पुणे यांचा निर्णय योग्य आहे. मात्र श्री.विटकर यांच्या स्वत:च्या उत्तरपत्रिकेची प्रत व नमुना उत्तरपत्रिकेची प्रत त्यांना दिली जाणे आवश्यक आहे. सरकारी

कर्मचाऱ्यांच्या भरतीप्रक्रियेतील पारदर्शकेतेचा तो एक भाग आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये सार्वजनिक कारभारातील पारदर्शकता हे एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. भरती प्रक्रियेत त्याचा विशेषत्वाने अवलंब होणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१) अपील अंशत मान्य.

२) अपीलकर्ता श्री.विनायक फकिरा बिटकर यांच्या विषयांकित परीक्षेतील उत्तरपत्रिकेची प्रत व नमुना उत्तरपत्रिकेची प्रत त्यांना जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख, पुणे यांनी त्वरित देऊन अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

**पुणे**
**दिनांक : २३/१२/२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**( विजय कुंवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री.विजयकुमार भगवानराव उघडे
५१, कोनापुरे चाळ, रेल्वे लाईन्स, सोलापूर **अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा**
सहायक कामगार आयुक्त,
५२ - अ, रेल्वे लाईन्स, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा**
सरकारी कामगार अधिकारी,
सहायक कामगार आयुक्त

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५३९/२००९/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१६.२.२००९ व ६.५.२००९ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१८.६.२००९ व ९.३.२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१६.६.२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | २९.६.२००९ |
| ७ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र - अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. विजयकुमार भगवानराव उघडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत आवश्यक शुल्क (रूपये २०/- चे मुद्रांक अथवा पोस्टल ऑर्डर) जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २२.१२.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. इरफान इब्राहिम चाफेरकर — अपीलकर्ता
मु.पो.पेठ शिवापूर, ता. पाटण, जि. सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, शिरोळा, जि. सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, शिरोळा, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५४ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.८.२००८ |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** | श्री. इरफान इब्राहिम चाफेरकर<br>मु.पो.पेठ शिवापूर, ता. पाटण, जि. सातारा |
| | **अपिलीय प्राधिकारी** तथा | तहसीलदार, शिरोळा, जि. सांगली<br>श्री. निलेश जाधव |
| | **जन माहिती अधिकारी** तथा | निवडणूक नायब तहसीलदार, शिरोळा, जि. सांगली<br>श्री. हणमंत नागनाथ कोळेकर |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २२.८.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३०.९.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २०.१२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २५.१.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

मौजे पेठलोंढ, ता. शिरोळा या गावाच्या पुनर्वसनापूर्वी कायमचे रहिवासी असलेल्या आपल्या नातेवाईकांचा मतदार यादीतील समावेश व पुरवठा शिधापत्रिकेच्या सन १९८५ पूर्वीचा दाखला वारंवार मागणी करूनही आपल्याला मिळाला नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. इरफान ईब्राहिम चाफेरकर यांनी केली.

श्री. चाफेरकर यांच्या अर्जानुसार संबंधित कागदपत्रांचा शोध विविध पातळ्यांवर घेण्यात आला, तथापि ती आढळली नाहीत व वेळोवेळी श्री. चाफेकर यांना कळविण्यात आले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवडणूक नायब तहसीलदार, शिराळा, जि. सांगली श्री. हणमंत नागनाथ कोळेकर व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, शिराळा श्री. निलेश जाधव यांनी कागदपत्रांचा शोध घेण्याबाबत केलेला प्रयत्न दर्शविणाऱ्या संबंधित पत्रव्यवहाराच्या प्रतींसह केले. संबंधित व्यक्तींच्या रहिवासाबाबत अपीलकर्त्यास इतर पुरावा आवश्यक असल्यास अभिलेखाचे अवलोकन करून प्राप्त करून घेता येईल, असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, शिराळा श्री. निलेश जाधव यांनी सांगितले. मतदार यादी पुनर्लेखनानंतर एक वर्षात व शिधापत्रिकांविषयी नोंदी १० वर्षात नियमानुसार नष्ट केल्या जातात, असेही त्यांनी नमूद केले. ते लक्षात घेता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. १८.१२.२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. काकासाहेब नामदेव जाधव — अपीलकर्ता
मु.पो.केम, ता.करमाळा, जि. सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, प्राथमिक आश्रमशाळा, केम,
ता.करमाळा, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५४ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २०.११.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** — श्री. काकासाहेब नामदेव जाधव
मु.पो.केम, ता.करमाळा, जि. सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा — विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, सोलापूर
तर्फे प्रतिनिधी श्री. एस.एस. कलशेट्टी

**जन माहिती अधिकारी** तथा — मुख्याध्यापक, प्राथमिक आश्रमशाळा, केम,
ता.करमाळा, जि. सोलापूर
श्री. देविदास गोपाळ यादव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३०.११.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २१.१२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ४.१.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ११.१.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

प्राथमिक आश्रम शाळा, केम, ता. करमाळा, जि. सोलापूर या शाळेच्या सन १९९७ ते २००७ अखेर पर्यंतच्या वीज बिलाच्या संदर्भातील माहिती मिळाली नसल्याची तक्रार अपीलकर्ता श्री. काकासाहेब नामदेव जाधव यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात व 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात केली आहे.

संबंधित माहिती शाळेकडे नसून श्री विठ्ठल देवस्थान ट्रस्ट या संस्थेकडे असल्याचे श्री. जाधव यांना कळविले. संस्थेकडून उपलब्ध झालेल्या पावत्या त्यांना देण्यात आल्या. आपण दारिद्र्य रेषेखालील असल्याचा दावा करून श्री. जाधव सातत्याने माहिती मागत असतात. संपूर्ण माहिती त्यांना देण्यात आली आहे. असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, प्राथमिक आश्रमशाळा, केम श्री. देविदास गोपाळ यादव यांनी केले. श्री. जाधव यांना माहिती देण्यात आली असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, सोलापूर श्रीमती मनिषा फुले यांचे लेखी निवेदन त्यांचे प्रतिनिधी श्री. एस.एस. कलशेट्टी यांनी सादर केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २८.१२.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री.सदानंद जगन्नाथ शेरे
मु.पो.जेजुरी, ता.पुरंदर, जि.पुणे — **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मुळशी विभाग, रास्ता पेठ, पुणे - ११ — **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
निरा उप विभाग, निरा, ता.पुरंदर, जि, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५४० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.१०.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री.सदानंद जगन्नाथ शेरे
मु.पो.जेजुरी, ता.पुरंदर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मुळशी विभाग, रास्ता पेठ, पुणे श्री. अ.अेस.महादार

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
निरा उप विभाग, निरा, ता.पुरंदर, जि, पुणे श्री.संजय महाजन

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.०६.०९.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१६.१०.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२४.१०.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१७.१२.२००७ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**
माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र -अ) प्रत सोबत जोडली आहे.

<u>**विवेचन**</u>

राज्य माहिती आयोगाने दि.२१.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने त्याच दिवशी सुनावणी घेण्यात आली.

आपल्या अर्जावर माहिती देण्यात आली. परंतु पाणीपुरवठा बंद करण्यात आल्याचे विभागीय आयुक्त, पुणे यांनी लोकशाही दिनामधील तक्रारींवर पत्र दिले. परंतु पाणीपट्टी नाही, लाईट बिल नाही, फुकट पाणीपुरवठा मात्र ईंडियन सीमलेस कंपनीला चालू आहे. नजीकच्या वाड्यावस्त्यांना पाणीपुरवठा होत नाही, आणि औद्योगिक कंपनीला मात्र फुकट पाणी पुरवठा केला जात आहे, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.सदानंद जगन्नाथ शेरे यांनी केली. हा सर्व प्रकार संशयास्पद असून कंपनीच्या पाणी वापरासाठी नगरपरिषदेला रु.१,३०,०००/- च्या पुढे बिल येते. या सर्व प्रकाराची चौकशी करावी, अशी मागणी श्री. शेरे यांनी केली.

श्री.शेरे यांनी मागितलेली माहिती विहित मुदतीत देण्यात आली आहे. दि.०१.०६.२००६ रोजी कंपनीचे वीज कनेक्शन बंद करण्यात आले असून ती माहितीही देण्यात आली आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,निरा उप विभाग, निरा, ता.पुरंदर, जि, पुणे श्री.संजय महाजन यांनी केले.

अपीलकर्त्यास मूळ अर्जानुसार माहिती देण्यात आली आहे. सरकारी जागेवर खाजगी कंपनीला वीज कनेक्शन कसे दिले जाते ? लाईट बिल परवडत नाही म्हणून डिझेल पंपाने पाणी उपसत आहे, हे कसे काय? अशा स्वरुपाचे प्रश्न श्री.शेरे यांनी लेखी निवेदनातही विचारले आहेत. तथापि, ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

<u>**आदेश**</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दिनांक : ११ /१२/२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

ॲड. चंद्रकांत नारायण घाणेकर
हिंद स्वराज ट्रस्ट, फिरोदिया होस्टेल,
आगरकर रोड, पुणे-४११ ००४ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** — गोखले इन्स्टिटयूट ऑफ पोलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स, पुणे- ४११ ००४ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** — गोखले इन्स्टिटयूट ऑफ पोलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स, पुणे- ४११ ००४

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६०० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १७.११.२००९ |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** | ॲड. चंद्रकांत नारायण घाणेकर<br>द्वारा हिंद स्वराज ट्रस्ट, फिरोदिया होस्टेल,<br>आगरकर रोड, पुणे-४११ ००४ |
| | **अपिलीय प्राधिकारी** | गोखले इन्स्टिटयूट ऑफ पोलिटिक्स अँड<br>इकॉनॉमिक्स, पुणे- ४११ ००४<br>श्री. सूर्य नारायण त्रिपाठी |
| | **जन माहिती अधिकारी** | गोखले इन्स्टिटयूट ऑफ पोलिटिक्स अँड<br>इकॉनॉमिक्स, पुणे- ४११ ००४ डॉ.कैलास डवरे |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २७.९.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २५.१०.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

श्री. विठ्ठल भगवान लोकरे यांच्या पगार विवरण पत्राच्या प्रतीसह सन १९९० पासूनची माहिती आपण जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. केंद्रिय कृषि मंत्रालयाला संबंधित कर्मचाऱ्यांची वेतन व भत्तेविषयक विवरणपत्रे दर वर्षी पाठविली जातात. ती पूर्ण न देता अपुरी व अनावश्यक माहिती दिली. अवलोकनासाठी मागितलेल्या संचिका उपलब्ध करून दिल्या जात नाहीत, अशी तक्रार अपीलकर्ता ॲड. चंद्रकांत नारायण घाणेकर यांनी केली. आयोगाकडील श्री. लोकरे यांच्या अपील क्र.२३६१ मध्ये ही माहिती देण्याचे आदेश आयोगाने दिले असूनही माहिती दिली जात नाही, असेही प्रतिपादन त्यांनी केले.

अपील क्र.२३६१ मधील आदेशानुसार सर्व माहिती देण्यात आली आहे. परंतु या माहितीने आपले समाधान होत नसल्याचे अपीलकर्त्याचे म्हणणे आहे. ॲड. घाणेकर यांनी श्री. लोकरे यांच्या संदर्भातील सन १९६७ पासूनची सेवापुस्तकाची प्रत व अन्य कर्मचाऱ्यांची माहिती मागितली आहे. विशिष्ट नमुन्यात त्यांनी माहिती मागितली असून तशा स्वरूपात माहिती ठेवली जात नाही व निधी उपलब्ध करून देणाऱ्या संस्था अशा नमुन्यात माहिती मागत नाहीत, त्यामुळे तशी माहिती ठेवली जात नाही. मागितलेली माहिती विस्तृत असून संस्थेकडे मनुष्यबळ मर्यादित आहे, असे प्रतिपादन तत्कालीन जन माहिती अधिकारी व विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी केले.

ॲड. घाणेकर यांनी मागितलेल्या नमुन्यात माहिती ठेवली जात नाही व संस्थेकडील मनुष्यबळाचा विचार करता तशा स्वरुपात विस्तृत माहिती तयार करून देणे शक्य नाही. सर्व संबंधित अभिलेख पाहणीसाठी उपलब्ध असल्याचे त्यांनी वेळोवेळी सांगण्यात आले आहे, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स यांनी केले.

ॲड. घाणेकर यांनी मागितलेली माहिती २० ते ४० वर्षांच्या काळातील आहे. एवढ्या विस्तृत माहितीचे अपीलकर्त्याच्या मागणीप्रमाणे विशिष्ट नमुन्यात संकलन करून देणे शक्य नसल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे निवेदन योग्य आहे. अपीलकर्त्याने आवश्यक असलेल्या नेमक्या प्रतींची मागणी स्वतंत्र अर्ज देऊन करावी, तसेच अभिलेखाचे अवलोकन करून आवश्यक कागदपत्रांच्या प्रती प्राप्त करून घ्याव्यात. ही सर्व प्रक्रिया उभय बाजूंनी एक आठवड्यात पूर्ण करावी

व अपीलकर्त्यास माहिती निःशुल्क द्यावी. अपीलकर्त्याने अभिलेखाचे अवलोकन न केल्यास संस्थेने केलेली कार्यवाही पूर्ण झाल्याचे समजले जाईल, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुससार ॲड. घाणेकर यांनी अभिलेख तपासणीसाठीचा अर्ज दि. १३.११.२००९ रोजी सादर केला. परंतु त्यात मूळ अर्जाव्यतिरिक्तची व सुमारे ४० ते ४२ वर्षांच्या काळातील माहितीची मागणी केली. तरीही त्याच दिवशी अभिलेख अवलोकनासाठी त्यांना तारीख व वेळ कळविण्यात आली. ॲड. घाणेकर त्या दिवशी आले नाहीत, तसेच जन माहिती अधिकाऱ्यांना त्यांनी काहीही कळविलेले नाही. मात्र श्री. विठ्ठल भगवान लोकरे हे उपस्थित राहून अभिलेख अवलोकनाची मागणी करू लागले. परंतु ते मूळ अर्जदार व अपीलकर्ता नाहीत. या पध्दतीने जन माहिती अधिकारी, अपिलीय प्राधिकारी व संस्थेचे अन्य कर्मचारी यांचा वेळ वाया घालविण्यात येत असून नियमित कामात व्यत्यय आणण्याचा हा प्रयत्न आहे, असे जन माहिती अधिकारी गोखले इन्स्टिटयूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स , पुणे यांनी दि. २.१२.२००९ च्या पत्रान्वये आयोगास कळविले. ते लक्षात घेता आयोगाने सुनावणीच्या वेळी दिलेल्या मौखिक आदेशानुसार कार्यवाही पूर्ण झाली आहे. तसेच मूळ मागणी व्यतिरिक्त मागणी अपिलात वा पूरक अर्जांद्वारे करणे, अभिलेख अवलोकनासाठी न जाणे व अन्य व्यक्तीने अनधिकाराने अभिलेख अवलोकनाचा हक्क सांगणे ही कृती योग्य नाही, याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. १८.१२.२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.शामराव सोपानराव दोरगे
मु.पो.यवत, ता.दौंड, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
सहकारभवन(पाटस रोड), दौंड, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव,
ग्रामविकास सेवा सहकारी सोसायटी लि., मु.पो.यवत, ता.दौंड, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६४६ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.६.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शामराव सोपानराव दोरगे
मु.पो.यवत, ता.दौंड, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
सहकारभवन(पाटस रोड), दौंड, जि.पुणे श्री.बी.एम.नावरे

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, ग्रामविकास सेवा सहकारी सोसायटी लि.,
मु.पो.यवत, ता.दौंड, जि.पुणे श्री.बा.ह.वाघमोडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १४.८.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४.११.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २६.९.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. २६.११.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२६.११.२००८ व २५.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपिलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी गैरहजर राहिल्याने दि.१९.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

कर्जप्रकरणातील सन २००१ चे ७/१२ उतारे ग्रामविकास सहकारी सेवा सोसायटीने दिले नाहीत, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.शामराव सोपानराव दोरगे यांनी केली.

७/१२ चे संबंधित उतारे सोसायटीकडे उपलब्ध नाहीत, बँकेकडे दिलेले आहेत. आजच्या तारखांचे ७/१२ उतारे उपलब्ध असून ते दिले आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामविकास सेवा सहकारी सोसायटी लि., मु.पो.यवत, ता.दौंड, जि.पुणे श्री.बा.ह.वाघमोडे यांनी केले. माहिती एका महिन्यात द्यावी, असा निर्णय अपिलात आपण दिला असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सहकारभवन (पाटस रोड), ता.दौंड, जि.पुणे श्री.बी.एम.नाबरे यांनी नमूद केले.

सन २००१ च्या उताऱ्यांबाबत तपासणी करून अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सहकारभवन (पाटस रोड), ता.दौंड, जि.पुणे यांनी आयोगाला अहवाल सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. सन २००१ चे ७/१२ उतारे संस्थेच्या दप्तरी उपलब्ध होऊ शकत नसल्याने देता आले नाहीत. अन्य सर्व माहिती पूर्वीच देण्यात आलेली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामविकास सेवा सहकारी सोसायटी लि., मु.पो.यवत, ता.दौंड, जि.पुणे यांनी कळविले असून टपालाच्या पोहोचपावतीसह व दिलेल्या

माहितीच्या प्रतींसह अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सहकारभवन (पाटस रोड), ता.दौंड, जि.पुणे श्री.बी.एम.नावरे यांनी आयोगाला अहवाल सादर केला तो मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२८.१२.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**